# जिल्हाधिकारी कार्यालय यवतमाळ
# पद भरती-२०११

**जाहिरात क्रमांक- अका/आस्था/कावि- १२२५/२०११, दि. २९ सप्टेंबर २०११**

महाराष्ट्र शासन सामान्य प्रशासन विभाग शासन निर्णय क्रमांकःबीसीसी-२०११/प्र.क्र.८६/२०११/१६-ब, दिनांक २ ऑगष्ट २०११ अन्वये तसेच मुख्य सचिव , यांचे अ.शा.पत्र दिनांक ९ ऑगष्ट २०११ अन्वये दिलेल्या निर्देशानुसार, जिल्हाधिकारी,यवतमाळ यांच्या आस्थापनेवरील गट-क " लिपिक-टंकलेखक " , " लघु-टंकलेखक " " वाहन चालक " व गट -ड संवर्गातील शिपाई यांची खालील दर्शविलेली मागास प्रवर्गातील रिक्त व अपंग आरक्षणातील रिक्तपदे सरळसेवेने भरतीसाठी निवड करण्याकरिता पात्र उमेदवारांकडून विहीत नमुन्यात दिनांक १२ ऑक्टोंबर २०११ पर्यंत अर्ज मागविण्यात येत आहे.

**१) अर्ज मागविणे , पात्र/अपात्र उमेदवारांची यादी प्रसिध्द करणे, इ.चा कालबध्द कार्यक्रम :**

| | |
|---|---|
| अर्ज स्वीकारण्याची शेवटची तारीख | १२ ऑक्टोंबर २०११ सांयकाळी ५.३० पर्यंत |
| पात्र/अपात्र उमेदवारांची यादी प्रसिध्द करणे | १३ ऑक्टोबर २०११ |
| प्रसिध्द केलेल्या यादीवर आक्षेप नोंदविण्याची मुदत | १३ ऑक्टोबर ते १४ ऑक्टोबर २०११ |
| आक्षेपाची नोंद घेऊन अंतिम यादी प्रसिध्द करणे | १७ ऑक्टोबर २०११ |
| लेखी परीक्षा दिनांक | ३० ऑक्टोबर २०११ |
| परीक्षेचा निकाल , प्रारुप निवड यादी प्रसिध्द करणे, प्रसिध्द केलेल्या प्रारुप निवड यादीवर आक्षेप नोंदविणे, व आलेल्या आक्षेपावर नियमानुसार कार्यवाही करुन अंतिम निवड यादी प्रसिध्द करणे इंत्यादीबाबत माहिती वेळोवेळी **http//:yavatmal.nic.in** या संकेतस्थळावर तसेच कार्यालयाचे सुचना फलकावर प्रसिध्द करण्यात येईल. तेव्हा भरती प्रकीया पुर्ण होईपर्यंत उमेदवारांनी वेळोवेळी पहावी. | |

टिप :- पात्र /अपात्र उमेदवारांचे प्रसिध्द केलेल्या यादीत डाटा एंन्ट्री मध्ये नाव शैक्षणीक अर्हता,पत्ता,सामाजिक आरक्षण, समांतर आरक्षण, इ. मध्ये अर्जानुसार चुक असल्यास उमेदवारांनी याबाबत लेखी आक्षेप अर्ज अधिक्षक, जिल्हाधिकारी कार्यालय,यवतमाळ यांचेकडे समक्ष सादर करावेत. तसेच निवड यादी संदर्भात आक्षेप घ्यावयाचे असल्यास सबंधीत उमेदवारांनी सदर आक्षेप अर्ज सदस्य सचिव तथा निवासी उपजिल्हाधिकारी,यवतमाळ यांचेकडे समक्ष सादर करावेत. पोष्टाने, फॅक्स द्वारे किंवा इतर मार्गाने प्राप्त होणा-या आक्षेप अर्जाचा विचार केला जाणार नाही याची उमेदवारांनी नोंद घ्यावी.

**१) पदाचे नांव :** **लिपिक-टंकलेखक**

सहाव्या वेतन आयोगानुसार वेतन बँड रु. ५२००-२०२००, ग्रेड वेतन रु. १९००/-

| प्रवर्ग | पद संख्या | महिला | समांतर आरक्षण | समांतर आरक्षणा व्यतिरिक्त |
|---|---|---|---|---|
| | | | अपंग | |
| विजा (अ) | १ | ० | २- पद श्रवण शक्तीतील दोष (Hearing impairment) | १ |
| भज (क) | १ | ० | | १ |

| | | | | |
|---|---|---|---|---|
| विमाप्र | २ | १ | | १ |
| एकुण पदसंख्या | ४ + अपंग २ = ६ | १ | २ | ३ |

टिप :- शासन परिपत्रक,सामान्य प्रशासन विभाग क्रमांक अपंग-१००९/प्र.क्र.२६/०९/१६-अ दिनांक १९/३/२०१० मधील सूचनांनुसार अपंगासाठीची पदे सरळसेवेने भरताना ती सामाजीक प्रवर्गात न दर्शविता ती स्वतंत्र पणे दर्शविण्यात येऊन पद भरतीची कार्यवाही करण्याबाबत निर्देश असल्यामुळे **लिपिक-टंकलेखक व शिपाई संवर्गाचे समांतर आरक्षणामध्ये अपंगाकरिता राखीव असलेल्या पदा करिता खुल्या प्रवर्गासह कोणत्याही सामाजिक प्रवर्गातील उमेदवार अर्ज करु शकतात.**

**२) पदाचे नांव :** **लघुटंकलेखक**

सहाव्या वेतन आयोनुसार वेतन बँड रु. ५२००-२०२००, ग्रेड वेतन रु.२४००/-

| प्रवर्ग | पद संख्या |
|---|---|
| | |
| अ.जा. | १ |
| एकुण | १ |

**३) पदाचे नांव :** **वाहन चालक**

सहाव्या वेतन आयोनुसार वेतन बँड रु. ५२००-२०२००, ग्रेड वेतन रु. १९००/-

| प्रवर्ग | पदसंख्या | समांतर आरक्षण माजी सैनिक | समांतर आरक्षणा व्यतिरिक्त |
|---|---|---|---|
| | | | |
| अ.जा. | २ | १ | १ |
| वि.मा.प्र. | १ | ० | १ |
| एकुण | ३ | १ | २ |

**४) पदाचे नांव :** **शिपाई**

सहाव्या वेतन आयोगानुसार वेतन बँड रु. ४४४०-७४४०, ग्रेड वेतन रु. १३०० /-

| प्रवर्ग | पद संख्या | समांतर आरक्षण | | समांतर आरक्षणा व्यतिरिक्त |
|---|---|---|---|---|
| | | महिला | अपंग | |
| अ.जा. | २ | १ | २ - पद क्षीणदृष्टी (Low vision )<br>२ - पद श्रवण शक्तीतील दोष (Hearing impairment )<br>३ - पद अस्थिव्यंग ( चलनवलनविषयक विकलांगता किंवा मेंदुचा अर्धांगवायू )<br>(अपंगाकरिता राखीव असलेल्या पदा करिता खुल्या प्रवर्गासह | १ |

| | | | | |
|---|---|---|---|---|
| | | | कोणत्याही सामाजिक प्रवर्गातील उमेदवार अर्ज करु शकतात ) | |
| विमाप्र | १ | ० | | १ |
| एकुण | ३ + अपंग ७ = १० | १ | ७ | ३ |

टिप :- **उपरोक्त अ.क्र. १ ते ४ मध्ये दर्शविलेल्या पदसंख्येमध्ये वाढ किंवा घट होण्याची शक्यता असून सर्व अधिकार प्रशासनाचे राहतील.**

**५) शैक्षणीक अर्हता :**

| पदाचे नांव | शैक्षणीक अर्हता |
|---|---|
| लिपिक-टंकलेखक | १) माध्यमिक शांलात परीक्षा उत्तीर्ण अथवा समतुल्य परीक्षा उत्तीर्ण असणे आवश्यक<br>२) मराठी टंकलेखन ३० शब्द.प्र.मि. किंवा इंग्रजी टंकलेखन ४० शब्द.प्र.मि. या गतीची शासकीय वार्णिज्य मंडळाची प्रमाणपत्र परीक्षा उत्तीर्ण आवश्यक.<br>३) संगणक अर्हता- महाराष्ट्र शासन, सामान्य प्रशासन विभाग, शासन निर्णय क्रमांक प्रशिक्षण-२०००/प्र.क्र.६१ २००१/३९, दिनांक १९ मार्च २००३ नुसार संगणक अर्हता नियुक्तीच्या दिनांकापासून दोन वर्षाच्या आत उत्तीर्ण करणे आवश्यक राहील. |
| लघुटंकलेखक | १) माध्यमिक शांलात परीक्षा उत्तीर्ण अथवा समतुल्य परीक्षा उत्तीर्ण असणे आवश्यक<br>२) शासन मान्यता प्राप्त बोर्डाकडील ८० शब्द प्र.मि. लघुलेखनवेग तसेच मराठी टंकलेखन ३० शब्द.प्र.मि. किंवा इंग्रजी टंकलेखन ४० शब्द.प्र.मि. या गतीची शासकीय वार्णिज्य मंडळाची प्रमाणपत्र परीक्षा उत्तीर्ण आवश्यक.<br>३) संगणक अर्हता- महाराष्ट्र शासनाच्या माहिती व तंत्रज्ञान विभागाने विहीत केलेले संगणक वापराबाबत प्रमाणपत्र (MS-CIT) असणे आवश्यक |
| वाहन चालक | १) इयत्ता चौथा वर्ग उत्तीर्ण असणे आवश्यक<br>२) जड वाहन हलके वाहन चालविण्याबाबत मोटार व्हेईकल अॅक्ट,१९३९ नुसार अनुज्ञप्ती धारण करणे आवश्यक<br>३) वाहन (कार/जीप) चालविण्याचा किमान ३ वर्षाचा अनुभव आवश्यक |
| शिपाई | १) इयत्ता चौथा वर्ग उत्तीर्ण असणे आवश्यक |

**६) वयोमर्यादा :**

अर्ज करण्याचे अंतिम दिनांकास उमेदवाराचे वय १८ वर्षापेक्षा कमी व ३३ वर्षापेक्षा जास्त नसावे. मागासवर्गीयांसाठी ३८ वर्षापेक्षा जास्त नसावे.

उच्च वयोमर्यादेत खालील बाबतीत शिथिलक्षम आहे. त्यानुसार खालील समांतर आरक्षातील व या जाहिरात नमूद प्रवर्गातील उमेदवार अर्ज करु शकतात.

५.१) अपंग उमेदवारांसाठी : ४५ वर्षापर्यंत.

५.२) प्रकल्पग्रस्त/भूकंपग्रस्त उमेदवारांसाठी : ४५ वर्षापर्यंत.

५.३) माजी सैनिक उमेदवारांसाठी : सशस्त्र दलातील सेवेइतका कालावधी अधिक ३ वर्ष

५.४) पदवीधर अंशकालीन उमेदवारांसाठी : ४६ वर्षापर्यंत.

५.५) खेळाडू उमेदवारांसाठी : ५ वर्षापर्यंत वयाची अट शिथील

५.६) स्वातंत्र्य संग्राम सैनिकांचे नामनिर्देशित पाल्य : ४५ वर्षापर्यत वयाची अट शिथील

**७) अर्ज सादर करणेबाबत आवश्यक सुचना :**

७.१ **या कार्यालयाचे http//:yavatmal.nic.in या संकेतस्थळावर जाहिरातीत नमुद पदा करिता दिलेला विहीत नमुन्यातील अर्ज सिंगल पेज (ए-४) आकाराच्या पांढऱ्या जाड कागदावर** एकाच बाजुला संगणकावर तयार केलेला व परीपूर्ण भरलेला अर्ज , जिल्हाधिकारी तथा अध्यक्ष, जिल्हा निवड समिती, जिल्हाधिकारी कार्यालय, यवतमाळ या पत्त्यावर डाकेव्दारे पाठविण्यात यावेत किंवा कार्यालयीन वेळेत व दिवशी सकाळी १०.०० ते ५.३० वाजे पर्यंत जिल्हाधिकारी कार्यालयात स्वीकारले जातील. **पोष्टाने किंवा अन्य कोणत्याही प्रकारे केलेले अर्ज कार्यालयीन वेळेत व दिवशी जिल्हाधिकारी कार्यालयात दिनांक १२ ऑक्टोबर २०११ सायंकाळी ५.३० वाजेपर्यंत प्राप्त व्हावयास पाहिजे.** विहीत मुदतीनंतर प्राप्त होणाऱ्या अर्जाचा विचार करण्यात येणार नाही . **पोष्टाने प्राप्त झ ालेल्या अर्जाच्या विलंबाबाबतची कोणतीही जबाबदारी जिल्हाधिकारी कार्यालयाची राहणार नाही याची विशेष नोंद घ्यावी.**

७.२ **प्रत्येक पदाकरीता स्वतंत्र अर्ज करणे बंधनकारक आहे. एकाच अर्जामध्ये एका पेक्षा अधिक पदांचा उल्लेख केल्यास सदर अर्ज अपात्र करण्यात येईल.**

**८) परीक्षा शुल्क :**

८.१ लिपिक-टंकलेखक ,लघुटंकलेखक व वाहन चालक या पदाकरिता खुल्या प्रवर्गातील उमेदवारांनी रुपये १५०/- ( रुपये एकशे पन्नास फक्त ) व मागास प्रवर्गातील उमेदवारांनी रुपये ७५/- (रुपये पंचाहात्तर फक्त) इतके परीक्षा शुल्क अर्जासोबत भरावयाचे आहे. सदर शुल्क न्यायालयीन फी मुद्रांकाच्या स्वरुपात (कोर्ट फी स्टँप ) अर्जा मधील विहीत जागेत चिटकवावेत. **माजी सैनिकांना अर्जासोबत आवेदन शुल्क भरण्याची आवश्यकता नाही.**

८.२ **शिपाई पदा करिता अर्जासोबत शुल्क भरण्याची आवश्यकता नाही.**

**९) लेखी परीक्षा प्रवेशपत्र :**

जाहिराती नमुद पदांकरिता अर्ज केलेल्या , लेखी परीक्षेकरीता पात्र ठरलेल्या **उमेदवारांनी लेखी परीक्षेचे प्रवेशपत्र व सुचनापत्र दिनांक १७ ऑक्टोबर २०११ नंतर http//:yavatmal.nic.in या संकेतस्थळावरुन उमेदवारांनी स्वतः काढुन घ्यावे . लेखी परीक्षा प्रवेशपत्र पोष्टाने पाठविल्या जाणार नाही. ज्या उमेदवारांना लेखी परीक्षा प्रवेशपत्र दिनांक २३ ऑक्टोबर २०११ पर्यंत संकते स्थळावरुन उपलब्ध होणार नाहीत त्यांनी सदस्य सचिव तथा निवासी उपजिल्हाधिकारी,यवतमाळ यांचेकडे प्रवेशपत्र मिळण्याबाबत अर्ज करावा त्यांना दि. २४ ,२५ व २९ ऑक्टोबर २०११ रोजी जिल्हाधिकारी कार्यालय,यवतमाळ येथुन लेखी परीक्षा प्रवेशपत्र उपलब्ध करुन देण्यात येईल.**

**१०) लेखी परीक्षेचे स्वरुप :**

१०.१ **लिपिक- टंकलेखक** पदा करीता सामान्य प्रशासन विभाग, शासन निर्णय दि.१९.१०.२००७ मधील परिच्छेद क्रमांक ६ (१) नुसार कमीत कमी अर्हता माध्यमिक शालांत परीक्षा (इयत्ता १० वी ) आहे अशा पदांकरिता परीक्षेचा दर्जा महाराष्ट्र राज्यातील माध्यमिक शालांत परीक्षेच्या दर्जाच्या समान असेल व लेखी परीक्षेला मराठी,इंग्रजी,सामान्य ज्ञान व अंकगणित या विषयांवरील प्रश्नांकरिता प्रत्येकी ५० गुण ठेवून एकूण २०० गुणांची

लेखी परीक्षा घेण्यात येईल. गुणवत्ता यादीत अंतर्भाव होण्यासाठी उमेदवाराने एकूण गुणांच्या ४५ % टक्के गुण प्राप्त करणे आवश्यक आहे.

१०.२ **अ) लघुटंकलेखक** पदा करीता सामान्य प्रशासन विभाग, शासन निर्णय दि.१९.१०.२००७ मधील परिच्छेद क्रमांक ६ (३) नुसार मराठी,इंग्रजी,सामान्य ज्ञान व अंकगणित या विषयांवरील प्रश्नांकरिता प्रत्येकी २५ गुण ठेवून एकूण १०० गुणांची लेखी परीक्षा घेण्यात येईल. लेखी परीक्षा महाराष्ट्र राज्यातील माध्यमिक शालांत परीक्षेच्या दर्जाच्या समान असेल. जे उमेदवार लेखी परीक्षेत किमान ४५ % गुण प्राप्त करतील अशा उमेदवारानांच व्यावसायीक चाचणी देता येईल.

**ब)** लेखी परीक्षेत अर्हताप्राप्त ठरलेल्या उमेदवारांची ८० गुणांची व्यावसायीक चाचणी घेण्यात येईल.

**क)** २० गुणांची मुलाखत घेण्यात येईल.

गुणवत्ता यादीत अंतर्भाव होण्यासाठी उमेदवाराने एकूण ( अ+ब+क) गुणांच्या ४५ % टक्के गुण प्राप्त करणे आवश्यक आहे.

१०.३ **वाहन चालक** पदा करीता ९० गुणांची व्यावसायीक चाचणी व १० गुणांची मुलाखत घेण्यात येईल.

१०.४ शिपाई पदा करीता सर्वसाधारण स्वरुपाची सामान्य ज्ञान चाचणी लेखी परीक्षा ७५ गुणांची व २५ गुणांची तोंडी परीक्षा घेण्यात येईल.

१०.५ लिपिक-टंकलेखक, लघ-टंकलेखक व शिपाई या तीन्ही पदाकरिता लेखी परीक्षची प्रश्नपत्रीका वस्तुनीष्ठ बहुपर्यायी स्वरुपाची असेल.

१०.६ परीक्षेचा निकाल तयार करतांना ज्या उमेदवारांना समान गुण असतील अशा उमेदवारांचा गुणवत्ता क्रम सामान्य प्रशासन विभाग, शासन निर्णय क्रमांक प्रनिमं/-२००७/ प्र.क्र.४६/ ०७/१३-अ, दिनांक २७.६.२००८ मधील मुद्दा क्रमांक ६ मध्ये दिलेल्या निकषावर लावला जाईल.

**११) निवड पध्दत :**

११.१ लिपिक-टंकलेखक पदा करीता उमेदवारांची निवड लेखी परीक्षेत मिळणाऱ्या गुणांच्या आधारे गुणानुक्रमे तयार केलेल्या यादीनुसार करण्यात येईल.

११.२ लघुटंकलेखक पदा करीता उमेदवारांची निवड लेखी परीक्षा , व्यावसायीक चाचणी , मुलाखत या तीन्ही मध्ये मिळणाऱ्या गुणांच्या आधारे गुणानुक्रमे तयार केलेल्या यादीनुसार करण्यात येईल.

११.३ वाहन चालक पदा करीता उमेदवारांची निवड व्यावसायीक चाचणी व मुलाखत या दोन्ही मध्ये मिळणाऱ्या गुणांच्या आधारे गुणानुक्रमे तयार केलेल्या यादीनुसार करण्यात येईल.

११.४ शिपाई पदा करीता उमेदवारांची निवड लेखी परीक्ष व मुलाखत या दोन्ही मध्ये मिळणा-या गुणांच्या आधारे गुणानुक्रमे तयार केलेल्या यादीनुसार करण्यात येईल.

**१२) अर्जा सोबत जोडावयाची कागदपत्र :**

अर्जासोबत खालील नमुद केलेल्या क्रमांकानुसार शैक्षणिक अर्हतेचे प्रमाणपत्र व इतर आवश्यक प्रमाणपत्रे जोडणे आवश्यक राहील. सर्व प्रमाणपत्रे केंद्र/राज्य शासनाने नियुक्त केलले राजपत्रित अधिकारी/पोस्टमास्टर (वर्ग-२ किंवा त्यावरील दर्जाचे) व मुख्याध्यापक (वर्ग-२ किंवा त्यावरील दर्जाचे)

अधिकारी यांनी साक्षांकीत केलेले असावेत. तसे नसल्यास अर्ज अपूर्ण आहे असे समजून अर्ज नाकारला जाईल.

१२.१ विहीत नमुन्यात अर्ज

१२.२ शैक्षणिक अर्हतेचे प्रमाणपत्र (गुणपत्रिका) पदवी/पदव्युत्तर पदवी.

१२.३ लघुलेखन प्रमाणपत्र, टंकलेखन प्रमाणपत्र, संगणक प्रमाणपत्र .

१२.४ वयासंबंधी दाखला (शाळा सोडण्याचे प्रमाणपत्र)

१२.५ जातीचे प्रमाणपत्र/ जात वैधता प्रमाणपत्र

१२.६ अधिवास प्रमाणपत्र

१२.७ उन्नत व प्रगत गटात मोडत नसल्याचे (नॉन क्रिमीलेअर) प्रमाणपत्र (विमुक्त जाती व भटक्या जमाती/विशेष मागास प्रवर्ग/ इतर मागासवर्ग करीता आवश्यक) वैध प्रमाणपत्र नसलेल्या उमेदवारांचा विचार केला जाणार नाही व अशा उमेदवारांना राखीव संवर्गाचा लाभ घेता येणार नाही.

१२.८ अपंग उमेदवाराने अपंगत्त्वाचे विहीत नमुन्यातील सक्षम अधिका-याचे प्रमाणपत्र

१२.९ वाहन चालविण्याचा परवाना अनुभव प्रमाणपत्र ( वाहन चालक पदा करीता)

१२.१० सेवायोजन कार्यालयात नांव नोंदणी केल्याचे प्रमाणपत्र.

**१३) सर्वसाधारण शर्ती व अटी :-**

१३.१ सदर्हू जाहीरातीमधील रिक्त पदांच्या संख्येत कमी/जास्त बदल होण्याची शक्यता आहे. त्याबाबत अर्जदाराला कोणताही दावा करता येणार नाही.

१३.२ उमेदवार हा महाराष्ट्राचा रहिवाशी असावा. (अधिवास प्रमाणपत्र अर्जासोबत जोडावे )

१३.३ उमेदवारास मराठी भाषेचे ज्ञान असणे आवश्यक आहे.

१३.४ जाहीरातीत विहीत केलेल्या नमुन्यातच अर्ज सादर करणे आवश्यक आहे.

१३.५ उमेदवाराने विहीत नमुन्यातील अर्जावर विहीत ठिकाणी अलीकडील काळातील एक पासपोर्ट आकाराचा फोटो लावावा व फोटोवर तसेच फोटोखाली विहीत चौकटीत स्वतःची स्वाक्षरी करावी.

१३.६ महाराष्ट्र राज्य लोकसेवा निरधीसूचीत जमाती (विमूक्त जाती), भटक्या जमाती, विशेष मागास प्रवर्ग व इतर मागासवर्ग यांच्यासाठी आरक्षण अधिनियम २००१ (सन २००४ चा महाराष्ट्र अधिनियम) हा अधिनियमातील नियम क्रमांक ४(२) (दोन) खालील परंतुकान्वये उन्नत व प्रगत गटात मोडत नसल्याचे (नॉन क्रिमीलेअर) प्रमाणपत्र सादर करणे आवश्यक आहे. तसेच, महिलांच्या आरक्षणाबाबत शासन निर्णय महिला व बालकल्याण विभाग क्रमांक /८२/२००१/मसेआ-००/प्र.क्र.४१५/का-२, दिनांक २५ मे २००१ मधील तरतुदीनुसार महिलांकरीता राखीव असलेल्या पदाचा फायदा घ्यावयाचा आहे त्या महिलांनी नॉन क्रिमीलेअर प्रमाणपत्र अर्जासोबत सादर करावे तसेच पुरेशा प्रमाणात महिला उमेदवार उपलब्ध न झाल्यास इतरत्र अदलाबदल न करता त्याच प्रवर्गातील पुरुष उमेदवारांमधून महिलांसाठी राखीव असलेली पदे भरण्यात येतील.

१३.७) उमेदवारानी त्यांचे निवडीबाबत किंवा निवडी नंतर पदस्थापनेबाबत कोणत्याही प्रकारचा प्रत्यक्ष अप्रत्यक्ष दबाव आणल्यास तसेच पदस्थापनेत बदल करण्याबाबत विनंती केल्यास त्याची निवड रद्द करण्यात येईल याची उमेदवारांनी नोंद घ्यावी.

**१४)** पात्र/अपात्र उमेदवारांची यादी , लेखी परीक्षेचा निकाल व निवड यादी जिल्हाधिकारी कार्यालयाचे नोटीस बोर्डावर तसेच **http//:yavatmal.nic.in** या वेबसाईटवर प्रसिध्द करण्यात येईल. याबाबत स्वतंत्र पत्र व्यवहार केला जाणार नाही याची उमेदवारांनी दक्षता घ्यावी.

**१५)** उमेदवाराने यापूर्वी जरी त्यांचे नांव रोजगार व स्वयंरोजगार मार्गदर्शन केंद्राकडे (सेवायोजन कार्यालय/ एकात्मिक आदिवासी प्रकल्प कार्यायल/जिल्हा सैनिक कार्यालय व जिल्हा पुनर्वसन कार्यालय येथे नोंदविले असेल व त्यांचे नावाची संबंधित कार्यालयाकडून शिफारस करण्यात आली असली तरी त्यांनी या पदांच्या भरतीसाठी स्वतंत्रपणे अर्ज करणे आवश्यक आहे.

**१६)** शासकीय/निमशासकीय कार्यालयात कार्यरत कर्मचाऱ्यांनी त्यांच्या कार्यालय प्रमुखांच्या परवानगीने अर्ज भरावा व अशा परवानगीची प्रत अर्जासोबत जोडावी.

**१७)** सामान्य प्रशासन विभाग, शा.नि.क्रमांक प्र.अ.क्र.१००५/प्र.क्र.३६/०५/१६-अ, दिनांक २६/५/२००५ नुसार लहान कुटुंब असल्याचे विहीत नमुन्यातील प्रतिज्ञापत्र अर्जासोबत सादर करणे आवश्यक आहे. (अविवाहीत उमेदवारांनीसुध्दा लागू नाही असे नमुद करुन सदर प्रतिज्ञापत्र सादर करणे आवश्यक आहे) नमुना जोडला आहे.

**१८)** अपंग व्यक्तीसांठी ठेवण्यात आलेल्या आरक्षणाचा लाभ मिळण्यासाठी सक्षम अधिका-याचे अपंगत्वाचे प्रमाणपत्र आवश्यक आहे. तसेच अपंगत्वाचे प्रमाण किमान ४०% असणे आवश्यक आहे. अपंगाची आरक्षित पदे शासन निर्णय दिनांक १९/३/२०१० नुसार अपंग उमेदवारांची निवड झाल्यानंतर ते ज्या सामाजिक प्रवर्गातील असतील त्यांना त्या सामाजिक प्रवर्गात समांतर आरक्षणा अंतर्गत सामावून घेण्यात येईल.

**१९)** उमेदवारांना लेखी परीक्षेस स्वखर्चाने हजर राहावे लागेल.

**२०)** निवड प्रक्रिया सुरु झाल्यानंतर किंवा नियुक्ती नंतर कोणत्याही क्षणी उमेदवाराने अर्जात व अर्जासोबत दिलेली माहिती / अगर कागदपत्र खोटी सादर केल्याचे किंवा खरी माहिती दडवून ठेवल्याचे निदर्शनास आल्यास तसेच उमेदवाराकडे पदाकरिता आवश्यक अर्हता नसल्याचे निदर्शनास आल्यास, त्यांचे पुर्व चारित्र बरोबर नसल्याचे आढळल्यास त्या उमेदवाराची उमेदवारी / नियुक्ती प्रक्रियेच्या कोणत्याही टप्प्यावर रद्द करण्यात येईल.

**२१)** उमेदवार ज्या राखीव जाती प्रवर्गाच्या पदासाठी अर्ज करीत असेल त्या जाती प्रवर्गाचे जातीचे प्रमाणपत्र जोडणे आवश्यक आहे. (असल्यास, जात वैधता प्रमाणपत्र सोबत जोडावे).शासन परिपत्रक क्रमांक/:बीसीसी-२००९/ प्र.क्र.२९१/०९/१६-ब दिनांक ५ नोव्हेंबर २००९ मधील निर्देशा प्रमाणे मागासवर्गीय संवर्गात निवड झालेल्या उमेदवारांना त्यांनी जात वैधता प्रमाणपत्र सादर केल्यावरच नियुक्ती आदेश निर्गमित करण्यात येतील. **२२)** शासन सेवेत नियुक्त होणाऱ्या उमेदवारांना परिभाषिक अंशदान निवृत्तीवेतन योजना लागू राहील.

**२३)** भरतीप्रक्रियेसंबंधीत देण्यात येणाऱ्या सुधारीत व अद्ययावत सूचना कार्यालयीन फलकावर व **http//:yavatmal.nic.in** या संकेतस्थळावर प्रसिध्द करण्यात येईल.

**२४)** जाहिरातीत नमुद अटीत बदल, जाहिरातीच्या काही भागात अंशतः बदल वा संपूर्ण भरती प्रकीया रद्द करण्याचे अधिकार अध्यक्ष, जिल्हा निवड समिती तथा जिल्हाधिकारी,यवतमाळ यांनी स्वतःकडे राखुन ठेवले आहेत.

उपरोक्त पदांसाठी विहीत नमुन्यातील अर्ज, अर्जासोबत जोडावयाची कागदपत्रे , भरतीबाबच्या सर्वसाधारण अटी व शर्ती तसेच भरतीबाबत इतर आवश्यक सूचना या कार्यालयाचे **http//:yavatmal.nic.in** या संकेत स्थळावर तसेच जिल्हाधिकारी कार्यालयाचे सूचना फलकावर प्रसिध्द

करण्यात आले आहे.. त्यानुसार इच्छुक व पात्र उमेदवारांनी त्यावरुन माहिती प्राप्त करुन आपले अर्ज पोष्टाद्वारे किंवा स्वतः विहीत मुदतीचे आत सादर करावेत.

**( श्रावण हर्डीकर )**

दिनांक : सप्टेंबर २०११

**अध्यक्ष, जिल्हा निवड समिती तथा**
**जिल्हाधिकारी, यवतमाळ**